# व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक घटक

प्रा. बिसुरे आर. एम.

1. शारीरिक क्षमता :

- सुदृढ शरीर
- योगाचे महत्व
- विविध खेळांची आवड

## 2. सकारात्मक दृष्टिकोन :

- जिद्द, चिकाटी, आवड आणि सकारात्मकतेची गरज
- इच्छाशक्ती
- अपयशातून यशाकडे जाण्याची मानसिकता

3. पोशाख :

- पोशाखावरून ओळख होत असते.
- व्यक्तिमत्वाला शोभेल असा पोशाख.
- प्रसंग, वेळेबरोबरच रंगसंगतीचा विचार करावा.
- पोशाखातून सभ्यता, सुसंस्कृतपणा प्रत्ययास येतो.

4. केशरचना व दागिने :

- व्यक्तिमत्वाला शोभेल अशी केशरचना
- मोजके, व्यक्तिमत्वाला शोभतील असे दागिने वापरतात.

5. मनमोकळेपणा :

- प्रत्येकाशी खुल्या मनाने संवाद करावा.
- सच्चेपणा, उदारता यांना महत्वाचे स्थान.

6. शिष्टाचार :

- मोठयांचा आदर ठेवावा.
- सार्वजनिक ठिकाणी वागण्याचे, बोलण्याचे संकेत पाळावेत.

7. मित्र वा समवयस्क :

- सुदृढ सामाजिक संबंध विकसीत करावेत.
- सर्वांप्रती आपुलकीची भावना ठेवावी.
- चांगले मैत्रभाव ठेवावे.

8. शिक्षण :

- शिक्षणाने व्यक्तिमत्वात बदल घडून येतो.
- शिक्षणाने व्यक्तीला समाजाभिमुख बनविते.
- शिक्षणाने विचारप्रक्रिया विकसीत होते.
- अनेक विद्याशाखेचे ज्ञान मिळते.
- बौद्धिक, भावनिक विकास होतो.
- वेगवेगळया क्षेत्रांमध्ये काम करण्यासाठी आवश्यक क्षमता प्राप्त होतात.
- ज्ञानाने व्यक्तिमत्वाला एक बौ.द्धिक तेज प्राप्त होते.

9. बौद्धिक सामर्थ्य :

- संपादित ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनात वापर करण्याची क्षमता म्हणजे बुद्धिमत्ता.
- बौद्धिक सामर्थ्याने व्यवहारज्ञान येते.
- अनुभवसंपन्न माणूस जीवनात यशस्वी होतो.

10. कुटुंब :

- व्यक्तिमत्वाची जडणघडण कुटुंबामध्येच होते.
- घरातील वातावरणाचा व्यक्तिमत्वावर प्रभाव पडतो.
- मुलांना चांगले सुसंस्कार देवून त्यांचे व्यक्तिमत्व परिपूर्ण बनविण्याची जबाबदारी कुटुंबावर असते.

11. चागल्या सवयी :

- चांगल्या सवयीमुळे आपल्या चारित्याची घडण होते.
- सदाचार, नैतिकता वाढीस लागते.
- इतरांशी चांगले संबंध तयार होतात.

12. संस्कृती :

- संस्कृतीचा प्रभाव व्यक्तिमत्वावर पडत असतो.
- सर्वसमावेशक संस्कृतीमध्ये व्यक्ती उन्नत, प्रगल्भ बनते.